संक्षिप्त वृत्त

सोलापूर : यशस्वी खेळाडूंसमवेत डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रा. प्रसाद कुंटे, डॉ. आनंद चव्हाण व इतर.

संगमेश्वर महाविद्यालयाचे तलवारबाजी स्पर्धेत यश

सोलापूर : महानगरपालिका आयोजित शालेय शहरस्तरीय तलवारबाजी स्पर्धेमध्ये संगमेश्वर महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यश संपादन केले. सेबर प्रकारात समृध्दी घाळे प्रथम, श्रुतिका चव्हाण द्वितीय, श्रेयश तळभंडारे प्रथम, व्यंकटेश खंडेलवाल द्वितीय, फॉईल प्रकारात सुमित जाधव प्रथम यांनी यश मिळविले. या खेळाडूंना डॉ. आनंद चव्हाण, प्रा. संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा. शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्रा. डॉ. ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा. प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.

सोलापूर : ज्ञान प्रबोधिनी शाळेत कार्यक्रमाप्रसंगी डॉ. माधवी रायते, शोभा बनशेट्टी, विनायक महिंद्रकर व इतर.

ज्ञान प्रबोधिनी शाळेत प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन

सोलापूर : सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाच्यावतीने ज्ञान प्रबोधिनी शाळेतील विद्यार्थिनींसाठी प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. बदलापूर प्रकरणानंतर महिलांसाठी असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झालेले आहे. यासाठी शालेय विद्यार्थिनींना 'बॅड टच गुड टच' या विषयावर प्रबोधन करण्यात आले. यावेळी वक्त्या म्हणून डॉ. माधवी रायते होत्या. यावेळी माजी महापौर शोभा बनशेट्टी, रोहिणी तडवळकर, मुख्याध्यापिका सुनीता चकोत, उत्सव अध्यक्ष विनायक महिंद्रकर, बसवराज येरटे, गौरव जक्कापुरे, प्रसिध्दीप्रमुख शिवानंद येरटे, अमर कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

सोलापूर : दशरथ घाळे यांचा सत्कार करताना अझर शेख, नितीन घाळे, बसवराज गुंजले,

दशरथ घाळे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

सोलापूर : शिक्षक दिनाचे औचित्य साधून निर्मय प्रतिष्ठान ट्रस्टतर्फे शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल शरणाई बहुद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दशरथ कल्याणी घाळे यांना सन २०२४ चे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव अझर शेख, नितिन घाळे, बसवराज गुंजले, नागेश कोरे, महादेव कांबळे व योगेश हिरेमठ आदींनी त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे आयोजन राज्य विभाग प्रमुख हाजी इक्बाल बागमारू, वसिष्ठ सोनकांबळे, जब्बार शिकलगार, अशोक हत्ते, फारूक शेख आदींनी केले होते.

सोलापूर : यश मिळवलेल्या निशा लिंबोळे, भावना चाटला या मुलींसह प्रशालेतील शिक्षक.

जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत स्वामी विवेकानंद प्रशालेचे यश

सोलापूर : सोलापूर शहर-जिल्हा ॲथलेटिक असोसिएशनतर्फे एस. आर. पी. एफ. ग्राऊंड, सोरेगाव येथे झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत एमआयडीसी परिसरातील स्वामी विवेकानंद प्रशालेने दोन पदके पटकावले. १६ वर्षांखालील मुलींच्या गटात भालाफेक क्रीडा प्रकारात निशा लिंबोळे हिने सुवर्णपदक तर भावना चाटला हिने रौप्य पदक पटकावले. मुलींचे नॅब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश वलगुलवार, उपाध्यक्ष अनुगीता पवार, शशीभूषण वलगुलवार, मुख्याध्यापिका सीमा श्रीगोंदेकर यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा शिक्षक सुभाष माने, गणपती कोळी, खंडू शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

वरद गणपतीतर्फे मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

सोलापूर : वरद गणपती स्नेहारिका गृहसंचालित गांधी नगर अक्कलकोट रोड गणेशोत्सव मंडळातर्फे नेत्रदान संकल्प शिबिर आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. या शिबिरात जिल्हा नेत्रदान समुपदेशक विकास लिंगराज, नेत्रचिकित्सक अधिकारी नदाफ मॅडम, सुमय्या शेख यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. प्रमुख उपस्थिती म्हणून किशोर शेराल, अर्चना बोडा, गणपती मंडळाचे अध्यक्ष विनायक नादरगी तसेच ज्येष्ठ सल्लागार म्हणून अरुण अनंत पाटील यांची उपस्थिती लाभली.

महिलांचा आनंद सांगतो,

'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुपरहिट'

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली भावना

परंडा/सुहास मस्के

'मला मुख्यमंत्री पदापेक्षा भाऊ हा शब्द जिव्हाळ्याचा वाटतो. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाच्या आजच्या कार्यक्रमात उत्साहाने सहभागी झालेल्या लाडक्या बहिणींच्या डोळ्यातील आनंद पाहून मनाला अतिशय समाधान मिळत आहे. त्यांच्या डोळ्यातील हा आनंद म्हणजे या योजनेच्या यशस्वितेची पावती आहे. ही योजना 'सुपरहिट' ठरल्याचे यातून स्पष्ट होत असल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. परंडा येथे आज महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती कार्यक्रमात ते बोलत होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत, आमदार ज्ञानराज चौगुले, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष,जिल्हा पोलीस अधीक्षक उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील, संजय जाधव, प्रा. शिवाजी सावंत, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत शिवसेना जिल्हाप्रमुख दत्तात्रय साळुंके, संजय गाढवे, पृथ्वीराज सावंत, नवनाथ जगताप, राहुल डोके, संजयकुमार बनसोडे, गौतम लटके, जयदेव गोफणे, दत्तात्रय रणभोर, आण्णा जाधव, बालाजी नेटके आदी उपस्थित होते.

शिंदे पुढे म्हणाले, 'महिला सक्षम तर देश सक्षम' हे ब्रीद लक्षात घेऊन राज्य शासनाने ही योजना प्रभावीपणे राबविली. या योजनेतून लाडक्या बहिणींच्या खात्यावर रक्कम जमा झाली असून त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, त्यांच्याकडून मिळणारे प्रेम पाहिल्यानंतर मनाला समाधान मिळत आहे. उजनी धरणातून सीना-कोळेगाव प्रकल्पात पाणी आणण्याचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी येत्या पंधरा दिवसात बैठक घेणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

पालकमंत्री डॉ. सावंत यांनी या प्रकल्पाचे ९८ टक्के काम पूर्ण झाले असून गेल्या तीस वर्षांपासून प्रतीक्षा असलेला हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी लक्ष घालण्याची विनंती मुख्यमंत्र्यांना केली होती. परंडा येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत पालकमंत्री प्रा. डॉ. सावंत यांनी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत गेल्या दोन वर्षात नागरिकांना पुरविण्यात आलेल्या आरोग्य सुविधांचा लेखाजोखा मांडला.

शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी कटिबद्ध

शेतकऱ्यांसाठीही राज्य शासनाने मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेतून साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी सन्मान योजना सुरु करून देशात पहिल्यांदाच राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर दरवर्षी सहा हजार रुपये जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. यासोबतच शेतकऱ्यांना केवळ एक रुपये विमा हप्ता भरून प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ दिला असून शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

परंडा : लाडक्या बहिणींकडून रक्षा बंधन करुन घेताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.

ट्रकमधून ५२ हजाराचे डिझेल चोरले

मोहोळ/सुहास मस्के

येथील ढाब्यासमोर पार्कींग केलेल्या दोन ट्रकच्या टाकींतून चोरट्याने ४७० लिटर डिझेल शिताफीने पळविले. ही घटना शुक्रवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी यशोदानंद प्रसाद तिवारी (रा. नागपूर) या ड्रायव्हरने मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याने गुरुवारी रात्रीच्या सुमारास त्याचा एमएच ४० सीडी- ५७३२ तसेच त्याच्या मित्राची एमएच ४० - सीडी-४२९२ असे दोन ट्रक पुणे महामार्गावरील मोहोळ येथे असलेल्या तुकाई ढाबासमोर लावले होते. पहाटेच्या सुमारास दोन्ही वाहनाच्या टाकींचे कुलूप तोडून चोरट्याने त्यातील ५१ हजार ८७० रुपये किमतीचे डिझेल चोरून नेले, असे त्याच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार ढवळे करीत आहेत.

तोल जाऊन पडल्याने जखमी

सोलापूर : दारूच्या नशेत घरातून बाहेर येताना घराजवळ तोल जाऊन पडल्याने वृद्ध जखमी झाल्याची घटना दि. ११ सप्टेंबर रोजी घडली. यात जयसिंग बडुरवाले (वय-६० रा. बेडर पूल, लष्कर) हे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे मुलगा किरण बडुरवाले यांनी दाखल केले.

मुख्यमंत्री योजनादूत; अर्जाची मुदत वाढवली

सोलापूर/प्रतिनिधी

शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून आता १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी

योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी १ लाख ६६ हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्या दाखल कागदपत्रे/प्रमाणपत्र इ. अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. दि. १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

राजकारणात 'सेवा परमोधर्म' सूत्र लक्षात ठेवा : संधवान

पुणे/प्रतिनिधी

'सेवा परमोधर्म' हे सूत्र लक्षात ठेवून राजकारणाच्या मैदानात उतरावे. जेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्तींचा विकास होईल तेव्हाच भारत विश्वगुरू बनेल, असे पंजाब विधानसभेचे सभापती कुलतारसिंह संधवान यांनी सांगितले.'

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हिर्सिटीच्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटच्यावतीने आयोजित 'मास्टर्स इन पॉलिटिकल लिडरशीप अँड गव्हर्नमेंट'(एमपीजी) २० व्या बॅचच्या प्रारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी राजस्थान विधानसभेचे माजी सभापती डॉ. सी. पी. जोशी व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ कराड होते. तसेच एमआयटी स्कूल ऑफ गर्व्हमेंटचे संस्थापक व डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल कराड, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, मिटसॉगचे संचालक डॉ. के. गिरीसन, प्रा. डॉ. परिमल माया सुधाकर व श्रीधर पब्बीशेट्टी हे उपस्थित होते. यावेळी नॅशनल लॅजिलेटिव्ह कॉन्फरन्सच्या कॉपी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी नीलम गोऱ्हे, सी. पी. जोशी, प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, डॉ. आर. एम. चिटणीस, डॉ. परिमल सुधाकर, विद्यार्थी संस्कृती ढोलमा आणि ध्रुव सावजी यांनीही संबोधन केले.

बार्शी : एमआयटी स्कूलच्या नवीन बॅचच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करताना कुलतारसिंह संधवान, नीलम गोऱ्हे, डॉ. जोशी, विश्वनाथ कराड.

माळशिरस तालुक्यात ४२ गुन्हेगारांना राहण्यास तात्पुरती मनाई

वेळापूर/प्रतिनिधी

गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद असे विविध धार्मिक सण साजरे होत असल्याने या कालावधीत कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी यांनी अवैध धंद्याशी संपर्कात असलेल्या ४२ व्यक्तींना माळशिरस तालुक्याच्या हद्दीत राहण्यास व प्रवेश करण्यास मनाई आदेश काढण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलूज यांच्याकडे प्रस्ताव पाठवले होते.

प्रांत विजया पांगरकर यांनी तात्पुरत्या स्वरूपात माळशिरस तालुका हद्दीत प्रवेश व राहण्यास १५ ते १७ सप्टेंबर असे तीन दिवसांची मनाई करण्याचा आदेश सुनावला आहे.

गणेश विसर्जनासाठी क्रेन, होडी अन् गाड्यांची व्यवस्था

- अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांची माहिती
- सीसीटीव्हीच्या माध्यमातून विशेष लक्ष राहणार
- ११ विसर्जन कुंड तर ७८ संकलन केंद्र

सोलापूर/प्रतिनिधी

विसर्जनापूर्वी राहिलेली कामे पूर्ण करण्यासंदर्भात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. 'श्रीं'ची मूर्ती संकलनासाठी व विसर्जनासाठी ७ क्रेन, ३ होडी व १०४ गाड्यांची व्यवस्था करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

गणेश विसर्जन २०२४ करिता सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या निर्देशानुसार इंद्रभुवन येथील मीटिंग हॉल येथे श्रीगणेश उत्सव विसर्जना संदर्भात आज सर्व खातेप्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली, त्याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे मार्गदर्शन करत होते.

याप्रसंगी उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त अर्जुन सुरवसे सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, उपसंचालक नगर विकास मनीष भिष्णूरकर, नगर अभियंता सारिका आकुलवार, सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे, कार्यकारी अभियंता विद्युत राजेश परदेशी, अग्निशामक विभागाचे प्रमुख राकेश साळुंखे, सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे, आरोग्य अधिकारी राखी माने, उपअभियंता किशोर सातपुते, उद्यान प्रमुख किरण जगदाळे आदी उपस्थित होते. सोलापूर महानगर पालिकेच्यावतीने गणेशोत्सवाच्या विसर्जनाकरिता ११ विसर्जन कुंड तर ७८ संकलन केंद्र उभारण्यात आले आहेत.

तुळजापूर रोड येथील खाण, विष्णू घाट, गणपती घाट त्याचबरोबर घरकुल येथील म्हाडा विहीर तसेच इतर विसर्जन कुंड, गणपती विसर्जनासाठी महापालिकेने तयारी पूर्ण केली असून मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजवणे, झाडांचे फांद्या कट करणे तसेच लाईटची व्यवस्था करण्यात येणार आहे.

सोलापूर : आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे.

राहिलेली कामे पूर्ण करण्याच्या सूचना

सर्व विसर्जन कुंड्यातील सालाबादप्रमाणे बॅरिगेटिंग, फ्लेक्स, मंडप, लाईट, स्पीकर इत्यादींची सोय करण्यात आली आहे. त्याचबरोबर कंबर तलाव, गणपती घाट, हिप्परगा खाण येथे सी.सी.टीव्हीच्या माध्यमातून विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. विसर्जनापूर्वी राहिलेली कामे पूर्ण करण्यासंदर्भात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

अशी राहणार यंत्रणा

'श्रीं' ची मूर्ती संकलनासाठी व विसर्जनासाठी ७ क्रेन, ३ होडी व १०४ गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर १८ घंट्यागाड्या, ३ आरसीएस गाड्या, ८ मुख्य आरोग्य निरीक्षक, ५० आरोग्य निरीक्षक, १८० सफाई कर्मचारी तसेच गणेश मूर्ती संकलना केंद्र व विसर्जन कुंड येथे ९०० मजूर इत्यादी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉक्टरांसह ॲम्ब्युलन्सची व्यवस्था

हिप्परगा खाण, नियोजन भवन, जगदंबा चौक, पद्मशाली चौक, नवी वेस पोलीस चौकी या अग्निशामक विभागाचे गाड्या उभे करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर डॉक्टरसह ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मिरवणूक मार्गावरील मोकाट जनावर यांचे बंदोबस्त करण्यासंदर्भात संबंधित विभागाला सूचना देण्यात आल्या.